## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र.२५० /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०४/२०१७

### १) क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ,भांडन करून काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०५/०४/२०१७ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आरोपीची आई भगीरथा कांबळे हिचे सोबत तुमचे खर्चाचे उधारीचे पैसे एकदाच नंतर देईन असे बोलत असतांना आरोपी याने तु माझे आईला का शिवीगाळ करतोस असे म्हणुन भांडन करून फिर्यादीचे शर्टचे कॉलर पकडुन बाजुला असलेल्या काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी प्रेम हरिलाल कुटील वय २३ वर्ष रा. चादंनी चौक संत कबिर वार्ड भंडारा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

### २) अनोळखी ईसम मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद :—

दिनांक ०५/०४/२०१७ चे ०८.३० वा. पुर्वी यातील फिर्यादी विठठल चिंदुजी हटवार वय ४९ वर्ष, रा. सातोना हा ठेक्यानी करित असलेल्या शेतावर १ अनोळखी ईसम वय अंदाजे ५० वर्ष वयोगटातील मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

### ३) अचानक प्रकृती बिघडल्याने औषधपचारा दरम्यान मृत्यु :—

दिनांक २०/०३/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील मृतक कुलदीपसिंग इंदरसिंग चव्हान वय ३५ वर्ष, रा. धानला जिल्हा नागपुर हा शिवमंदीराजवळ पडुन असल्याने त्याला औषधोपचारा कामी सामान्य रूग्नालय भंडारा येथे भरती केले असता तेथील डॉक्टरांनी उपचार करूनमेडीकल कॉलेज नागपुर येथे पुढील औषधोपचारा कामी रेफर करून भरती केले असता उपचार सुरू असतांनी मरण पावल्याने पोस्टे. अंजनी नागपुर येथे मर्ग क्र.००/१७ कलम १७४ चे कागदपत्र पोस्टे.ला प्राप्त झाल्याने पोस्टे ला सरतर्फे फिर्यादी पोना सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम,.१७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. किचक पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहे.

४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०५/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली १७० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४, तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १५७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.